ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख १३ जानेवारी, १९६० | अंक २

## विविध माहिती

**भारत-युगोस्लाव्हिआ व्यापार**—युगोस्लोव्हिआचें व्यापारी प्रतिनिधी मंडळ सध्यां भारतांत आलें असून मध्यवर्ती सरकारशीं त्याचीं बोलणीं चालू आहेत. उभयतां देशांत व्यापाराची वृद्धि करण्याचा ह्या वाटाघाटींचा उद्देश आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी युगोस्लाव्हिआकडून भारताला १० ते १५ कोटी रुपयांचें कर्ज व तांत्रिक साह्य मिळण्याची शक्यता आतां वाढली आहे.

**काबूलमधील विमानतळ**—रशिआच्या मदतीनें काबूल येथें बांधण्यांत येत असलेल्या विमानतळावरील मुख्य इमारत आतां तयार झाली आहे. इमारतीचा उद्घाटन-समारंभ नुकताच झाला. विमानतळावरील घसरपट्टी अजून पुरी व्हावयाची आहे. ह्या कामांत रशिअन तंत्रज्ञांची मदत घेण्यांत आली असून पुढील हिंवाळ्यापूर्वी घसरपट्टी तयार होईल.

**अणुशक्तीवरील वीजकेंद्र**—भारतामधील अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणारें पहिलें केंद्र सुरत व नवसारी ह्या शहरांच्या दरम्यान समुद्राच्या किनाऱ्यावर उभारलें जाण्याची बरीच शक्यता आहे. केंद्राच्या उभारणीसाठी ३० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. केंद्राच्या साह्यानें अणुबाँबसाठी लागणारें स्फोटक द्रव्यहि निर्माण करतां येईल.

**रबराची अधिक आयात**—भारतांत रबराच्या वस्तूंचें उत्पादन वाढत असल्यामुळें मध्यवर्ती सरकारनें मलायांतून अधिक प्रमाणांत रबराची आयात करण्याचें ठरविलें आहे. भारताचें औद्योगिकरण जसजसें होत जाईल तसतशी रबराची मागणीहि वाढत जाणार आहे. त्यामुळें अधिक आयात करण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. देशांतील उत्पादन पुरेसें नाहीं.

**२६ लाख विनतिकिटाचे प्रवासी**—चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत भारतामधील रेल्वेमार्गावर २६ लाख उतारूंना तिकिट न काढतां प्रवास करीत असतां पकडण्यांत आलें. ह्या उतारूंपासून वसूल करण्यांत आलेल्या भाड्यापोटीं व दंडापोटीं रेल्वेअधिकाऱ्यांनीं ५७ लाख रु. वसूल केले. जपानमधील रेल्वेप्रवासी सर्वांत अधिक सचोटीनें वागणारे आढळले आहेत.

**आल्फ्रेड क्रुप ह्यांची भारत-भेट**—सुप्रसिद्ध जर्मन उद्योगपति आल्फ्रेड क्रुप भारताला भेट देऊन गेले. त्यांनीं आपल्या भेटींत मध्यवर्ती सरकारच्या पोलाद व खाणी मंत्र्यांची भेट घेऊन चर्चा केली. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला पश्चिम जर्मनीकडून मोठी मदत मिळण्याचा संभव आहे. क्रुप ह्यांची भेट त्या दृष्टीनें महत्त्वाची ठरेल.

**राजस्थानमधील पडदा-पद्धत**—राजस्थान प्रदेशाच्या स्त्री-सल्लागार समितीनें राज्यांतील पडदा-पद्धतीविरुद्ध मोहीम उघडण्याचें ठरविलें आहे. ८ ते ११ वर्षेपर्यंत वय असलेल्या मुलींना सक्तीचें प्राथमिक शिक्षण देण्याची योजना अंमलांत आणून वरील मोहीम सुरू करण्यांत येणार आहे. त्याशिवाय समिति कुटुंब नियोजनेचा प्रचारहि करणार आहे.

**पाकिस्तानांतील कुटुंबनियोजन**—पाकिस्तान सरकारनें लाखों तरुण-तरुणींना संततिनियमनाचीं साधनें फुकट पुरविण्याचें ठरविलें आहे. हीं साधनें प्रसूतिगृहें व बालहित-संवर्धक संस्था ह्यांच्यामार्फत प्रसारित करण्यांत येतील. सरकारनें ह्या कामासाठी ८,८४,००० रु. खर्च करण्याचें चालू वर्षी ठरविलें आहे. ४,७०,००० रु. किंमतीच्या संततिनियमनाच्या साधनांच्या पुरवठ्याची तरतूद करण्यांत आली आहे.

**बिहारमधील दारुबंदी**—बिहार राज्यसरकारनें दारूबंदीचा कार्यक्रम चालू ठेवण्याचें ठरविलें आहे. दारूप्रमाणेंच अफूच्या सेवनालाहि बंदी करण्यांत आलेली आहे. अबकारी खात्याचे मंत्री श्री. शास्त्री दारुबंदी खात्याच्या नोकरांच्या संघटनेपुढें बोलतांना म्हणाले कीं, सरकारजवळ जमलेल्या आंकड्यांवरून स्वातंत्र्योत्तर कालांत दारू पिण्याची संवय वाढीस लागल्याचें दिसून येतें.

**सयामकडून तांदूळ घेणार**—सयामच्या सरकारकडून भारतानें तांदुळाचे नमुने व किंमती मागविल्या आहेत. १९६० सालांत भारत सयामकडून तांदूळ विकत घेण्यास पुन्हा प्रारंभ करील असें दिसतें. युद्धोत्तर कालांत १९५० पर्यंत भारत सयामकडून तांदूळ विकत घेत असे. पण नंतर खरेदीच्या करारांतील अटीबाबत मतभेद झाल्यामुळें भारतानें तांदूळ घेण्याचें बंद केलें होतें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**म्हैसूर विद्यापीठाची खरेदी**—म्हैसूर विद्यापीठानें एका स्थानिक सरदाराकडून त्याच्या मालकीची एक मोठी इमारत खरेदी करण्याचें ठरविलें आहे. इमारत व तिच्या भोंवतालची ३०० एकर जागा ह्यांच्यासाठीं विद्यापीठ १० लाख रु. देणार आहे. ह्या इमारतींत पदवीनंतरच्या परीक्षांचा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय होईल.

**अमेरिकेकडून कापसाचा पुरवठा**—अमेरिका भारत सरकारशीं एक करार करून सुमारें २॥ लाख गासड्या कापूस पुरविणार आहे. ह्यापूर्वीं अमेरिकेनें १ लाख गासड्या कापूस पुरविण्याचें कबूल केलेलें आहे. पाकिस्तानकडून येणाऱ्या २५,००० गासड्या जमेस धरल्या तर भारताच्या गिरण्यांना आतां कापसाची टंचाई पडणार नाहीं.

**मोरवी येथें सायन्स कॉलेज**—मोरवीच्या राजघराण्यानें मोरवी येथें एक सायन्स कॉलेज स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉलेजसाठी ३ लाख रुपयांची देणगीहि देण्यांत येणार असून त्याचें नांव महाराजा महेंद्रसिंह कॉलेज असें ठेवण्यांत येणार आहे. दिवंगत महाराज महेंद्रसिंह ह्यांचें स्मारक म्हणून कॉलेजची स्थापना करण्यांत येणार आहे. मोरवींतील लोकांनीं एक आर्ट्स कॉलेज स्थापन करण्याचें पूर्वींच ठरविलें आहे.

**स्वस्त घड्याळांची आयात**—भारत सरकारनें आयात परवान्यांच्या चालू सहामाहींत स्वस्त किंमतीच्या मनगटी घड्याळांची आयात करण्यास मुभा देण्याचें ठरविलें आहे. मात्र सोन्याचीं मनगटी घड्याळें आणि १५० रुपयांपेक्षा अधिक किंमत असलेलीं घड्याळें ह्यांच्या आयातीस परवानगी देण्यांत येणार नाहीं.

**नेपाळमधील रस्त्यासाठीं मदत**—नेपाळचा पूर्व भाग व पश्चिम भाग ह्यांना जोडणाऱ्या ७०० मैल रस्त्याच्या बांधणी-संबंधीं रशिअन तज्ज्ञांनीं आपला प्राथमिक अहवाल नेपाळ सरकारकडे पाठविला आहे. रशिआनें नेपाळला तीन कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याचा करार केलेला आहे. रशिआ नेपाळला एक वीजकेंद्रहि बांधून देणार आहे.

**शेती विद्यापीठाची स्थापना**—उत्तर प्रदेशांत रुद्रपूर ह्या ठिकाणीं एक शेतकी विद्यापीठ स्थापन करण्यांत येणार असून त्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें १·५० कोटी रुपये मंजूर केले आहेत. विद्यापीठांत दरसाल ३२५ विद्यार्थ्यांची शिकण्याची सोय होईल. २५ टक्के जागा उत्तर प्रदेशाबाहेरील विद्यार्थ्यांसाठीं आहेत.


५०　वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलिफोन : २७०९४

| | लाख | | लाख |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. ८·३० | ठेवी | रु. २०९·३४ |
| रिझर्व्ह | ,, ९·०१ | खेळतें भांडवल | ,, २३१·३० |
| कर्जें येणें | ,, ६७·५१ | तरतें भांडवल | ,, १६०·३८ |

तरत्या भांडवलाचें ठेवींशीं प्रमाण : ७६%

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहीम, वडाळा, पुणें व बेळगांव.




महिला शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई – ४.



शेतीच्या मशागतीस लोखंडी बळकट नांगरच वापरा

किर्लोस्कर नांगराने नांगरट खोल-वर होत असल्याने जमिनीतील तण न तण निघून पुढील मशागत करणे सुलभ जाते. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणें योग्य अशा नांगराची निवड करा.




किर्लोस्कर

स्थापना १८८८

सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)

STUSA KM4/59

**म्हैसूर विद्यापीठाची खरेदी**—म्हैसूर विद्यापीठानें एका स्थानिक सरदाराकडून त्याच्या मालकीची एक मोठी इमारत खरेदी करण्याचें ठरविलें आहे. इमारत व तिच्या भोंवतालची ३०० एकर जागा ह्यांच्यासाठीं विद्यापीठ १० लाख रु. देणार आहे. ह्या इमारतींत पदवीनंतरच्या परीक्षांचा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय होईल.

**अमेरिकेकडून कापसाचा पुरवठा**—अमेरिका भारत सरकारशीं एक करार करून सुमारें २॥ लाख गासड्या कापूस पुरविणार आहे. ह्यापूर्वीं अमेरिकेनें १ लाख गासड्या कापूस पुरविण्याचें कबूल केलेलें आहे. पाकिस्तानकडून येणाऱ्या २५,००० गासड्या जमेस धरल्या तर भारताच्या गिरण्यांना आतां कापसाची टंचाई पडणार नाहीं.

**मोरवी येथें सायन्स कॉलेज**—मोरवीच्या राजघराण्यानें मोरवी येथें एक सायन्स कॉलेज स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉलेजसाठीं ३ लाख रुपयांची देणगीहि देण्यांत येणार असून त्याचें नांव महाराजा महेंद्रसिंह कॉलेज असें ठेवण्यांत येणार आहे. दिवंगत महाराज महेंद्रसिंह ह्यांचें स्मारक म्हणून कॉलेजची स्थापना करण्यांत येणार आहे. मोरवींतील लोकांनीं एक आर्टस कॉलेज स्थापन करण्याचें पूर्वींच ठरविलें आहे.

**स्वस्त घड्याळांची आयात**—भारत सरकारनें आयात परवान्यांच्या चालू सहामाहींत स्वस्त किंमतीच्या मनगटी घड्याळांची आयात करण्यास मुभा देण्याचें ठरविलें आहे. मात्र सोन्याचीं मनगटी घड्याळें आणि १५० रुपयांपेक्षा अधिक किंमत असलेलीं घड्याळें ह्यांच्या आयातीस परवानगी देण्यांत येणार नाहीं.

**नेपाळमधील रस्त्यासाठीं मदत**—नेपाळचा पूर्व भाग व पश्चिम भाग ह्यांना जोडणाऱ्या ७०० मैल रस्त्याच्या बांधणी-संबंधीं रशिअन' तज्ज्ञांनीं आपला प्राथमिक अहवाल नेपाळ सरकारकडे पाठविला आहे. रशिआनें नेपाळला तीन कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याचा करार केलेला आहे. रशिआ नेपाळला एक वीजकेंद्रहि बांधून देणार आहे.

**शेती विद्यापीठाची स्थापना**—उत्तर प्रदेशांत रुद्रपूर ह्या ठिकाणीं एक शेतकी विद्यापीठ स्थापन करण्यांत येणार असून त्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें १·५० कोटी रुपये मंजूर केले आहेत. विद्यापीठांत दरसाल ३२५ विद्यार्थ्यांची शिकण्याची सोय होईल. २५ टक्के जागा उत्तर प्रदेशाबाहेरील विद्यार्थ्यांसाठीं आहेत.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलिफोन : २७०९४

| | लाख | | लाख |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. ८·३० | ठेवी | रु. २०९·३४ |
| रिझर्व्ह | ,, ९·०१ | खेळतें भांडवल | ,, २३१·३० |
| कर्जें येणें | ,, ६७·५१ | तरतें भांडवल | ,, १६०·३८ |

तरत्या भांडवलाचें ठेवींशीं प्रमाण : ७६%

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहीम, वडाळा, पुणें व बेळगांव.



महिला शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई – ४.

शेतीच्या मशागतीस लोखंडी बळकट नांगरच वापरा



किर्लोस्कर नांगराने नांगरट खोल-वर होत असल्याने जमिनीतील तण न तण निघून पुढील मशागत करणे सुलभ जाते. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.

किर्लोस्कर
स्थापना १८८८

सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)

TUSA KH4/59

# अर्थ

बुधवार, ता. ११ जानेवारी, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## शहरांतील लोकसंख्येच्या वाढीचें चित्र

इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ पॉप्युलेशन स्टडीज ह्या संस्थेचे डायरेक्टर डॉ. एस. चंद्रशेखर ह्यांनीं वाढत्या लोकसंख्येबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. इंडिअन कॉन्फरन्स ऑफ सोशल वर्कतर्फे भरविण्यांत आलेल्या परिसंवादांत ते बोलत होते. ते म्हणाले कीं भारत अजूनहि मुख्यत: शेतीप्रधान देश असून त्यांत खेडींच अधिक आहेत. पण हिंदमधील शहरांतील लोकसंख्या एकसारखी वाढत चालली आहे. १९०१ सालीं एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के लोकसंख्या शहरांतून राहत होती. १९५९ सालीं ही टक्केवारी २० टक्यांवर आली आहे. गेल्या तीस वर्षांत शहरांतील—विशेषत: हौरा, मुंबई, मद्रास व दिल्ली ह्या शहरांतील—लोकसंख्या तिपटीपेक्षाहि अधिक वाढली आहे. हिंदमधील खेड्यांत राहणाऱ्या लोकांवर आर्थिक दडपण एकसारखा प्रभाव पाडीत असतें. त्यामुळें खेड्यांतील लोक ग्रामीण भागांतून उठून शहरांत राहावयास जात असतात. शहरांतून सिनेमा, कॉफीगृहें, इत्यादि प्रकारची स्वस्त मनोरंजनाचीं साधनें असतात. शिवाय तात्पुरत्या स्वरूपाच्या हंगामी नोकऱ्या मिळण्याची शक्यताहि असते. शहरांतील लोकसंख्या वाढण्याचें आणखी एक कारण म्हणजे निर्वासितांचें आगमन. अशा रीतीनें रोज शेंकडों लोकांचे लोंढे शहराकडे वहात येत असतात. त्यापैकीं बरेचजण निरक्षर व बेकार असतात. त्यांना स्वच्छ राहणीची कल्पनाहि नसते. सध्या शहरांची जी परिस्थिति आहे त्या परिस्थितींत ह्या वाढत्या लोंढ्यांची सोय करणें अशक्यच आहे अगदीं प्राथमिक स्वरूपाच्या आरोग्याच्या सोयी, शाळा, रस्ते, दवाखाने, पाण्याचा पुरवठा, इत्यादि गोष्टी नव्या शहरवासीयांना पुरविणें अवघड झालेले आहे.

शहरांत २० ते २५ टक्के घरें तरी अशीं असतात कीं त्यांतून मलमूत्रविसर्जनाची सुद्धा सोय नसते. घरांची टंचाई खूपच आहे. त्यामुळें रस्त्याच्या कडेच्या पदपथावर वास्तव्य करणारांची संख्या रोज फुगत चालली आहे. अर्थातच गलिच्छ वस्त्या वाढत चालल्या आहेत. शहरांतील लोकसंख्येचा एक विशेष म्हणजे स्त्री-पुरुषांच्या संख्येंतील विषमता. बहुतेक शहरांतून स्त्रियांपेक्षां पुरुषांची संख्या अधिक आढळून येतें. बहुधा खेड्यांतून शहरांत आलेला पुरुष आपली बायको गांवींच ठेवून येतो. चार पैसे गांठी बांधून मग पुन्हा खेड्यांत जाण्याची त्याची इच्छा असते. स्त्री-पुरुषांच्या संख्येंतील विषमता आणि दाटीवाटीनें कसें तरी राहणें पडल्यामुळें, दुराचार आणि दुःख ह्यांच्यांत वाढ झाल्यास आश्चर्य नाहीं. कांहीं शहरें तर इतकीं घाणेरडीं आहेत कीं त्यांच्यापासून रोगांचा फैलाव होतो असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं ही परिस्थिति सुधारण्यास लागणारा पैसा नाहीं असें नेहमीं सांगण्यांत येतें. हें खरें असेल तर लोकांची जननक्षमता मोठ्या प्रमाणावर नाहींशी करणें एवढा एकच जालीम उपाय शिल्लक राहतो. पण, आपल्या शहरांतील दारिद्र्य आणि दैन्य लक्षांत घेतां, तोहि उपाय योग्य वाटूं लागतो. संततिनियमनाचीं मान्यता पावलेलीं साधनें भारतांत व्यवहार्य ठरलेलीं नाहींत. म्हणून स्त्री अगर पुरुष ह्यांच्यावर शस्त्रक्रिया करणेंच अनिवार्य ठरतें. ह्या उपायाबद्दल लोकांना चांगली माहिती देण्यांत आली पाहिजे. ह्या उपायामुळें कसा फायदा होतो हें त्यांना पटलें तर तीन किंवा चार मुलें असलेले लोक शस्त्रक्रियेला तयार होतील ह्यांत शंका नाहीं. शहरांतून तरी लोकसंख्येच्या ह्या नियोजनाला अग्रहक्क देण्यांत आला पाहिजे. अस्ताव्यस्त आणि अनियोजित रीतीनें पसरलेल्या शहरांत अनियंत्रित रीतीनें लोकसंख्येची वाढ होत आहे; हें चित्र बदलणें आतां अगदीं अपरिहार्य झालेलें आहे.

---

## छोट्या पाटबंधाऱ्यांच्या कामाचें महत्त्व

भारताच्या अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अनेक मोठमोठीं धरणाचीं कामें हातीं घेण्यांत आलीं व तीं यथाक्रम पार पाडण्यांत येत आहेत. मोठ्या धरणापासून पाणीपुरवठ्याबरोबरच वीजनिर्मिति करतां येणें शक्य असतें. त्याचप्रमाणें त्यांच्यामुळें पुरावर नियंत्रण ठेवणेंहि शक्य होतें. मोठीं धरणें बांधण्यास सर्वच ठिकाणीं अनुकूल भौगोलिक परिस्थिति नसते. शिवाय मोठ्या धरणांना खर्चहि अवाढव्य लागतो. मोठ्या धरणांपेक्षा छोटी धरणें बांधणें कमी खर्चाचें असतें. त्यामुळें व इतर कारणांसाठी आतां छोटीं पाटबंधाऱ्याचीं कामें हातीं घेण्यावर जोर देण्यांत येऊं लागला आहे. छोट्या पाटबंधाऱ्याचीं कामें करतांना स्थानिक लोकांचें सहकार्य मिळणें सुलभ जातें हीहि गोष्ट महत्वाची आहे. मोठ्या धरणामुळें लक्षावधि एकर जमिनीला पाणीपुरवठा करण्याची सोय होत असली तरी ह्या सोयीचा फारसा फायदा घेतला जात नाहीं असें दिसून येतें. ह्यासंबंधीं भारतांत आलेल्या एका फ्रेंच शेती तज्ज्ञानें दिलेले आकडे उद्बोधक आहेत. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत पुऱ्या झालेल्या मोठ्या धरणांतील पाण्यामुळें ६४ लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा करणें शक्य झालें. पण १९५८ साळअखेर अवघ्या १६ लाख एकर जमिनीच्या माळकांनींच ह्या सोयीचा फायदा घेतल्याचें आढळून आलें. मोठ्या धरणांतील पाण्याचे दर पुष्कळदां शेतकऱ्याला न परवडणारे असतात. स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेऊन छोटीं पाटबंधाऱ्याचीं कामें केल्यास व विहिरी, तळीं-तलाव ह्यांची दुरुस्ती केल्यास अन्नधान्याच्या उत्पादनांत महत्त्वाची भर घालतां येईल असें तज्ज्ञांचें मत आहे.

---

## "अपराजितो" चित्रपटाचा गौरव

"अपराजितो" ह्या चित्रपटास न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यूननें १९५९ मधील सर्वोत्कृष्ट दहा चित्रपटांत स्थान दिलें आहे.

## तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम व शेती

हिंदमधील शेतीचा विकास करण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जितका खर्च करण्यांत आला, त्याच्या जवळजवळ दुपटीनें खर्च तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत येण्याचा संभव आहे. मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेती खात्यानें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शेतीसाठी १,००० कोटी रुपयांची सूचना केली आहे. त्याशिवाय समाजविकास योजनांच्या कक्षेत येणाऱ्या शेतीविषयक योजनांसाठी ४८५ कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे. ह्या एकूण खर्चांत कदाचित् शें-दोनशें कोटींची कपात होईल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शेतीसाठी २८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. त्याशिवाय समाज-विकास योजनांतर्गत शेतीच्या सुधारणेसाठी ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सगळ्यांत जास्त रक्कम छोट्या पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी बाजूला काढून ठेवण्यांत येणार आहे. पाणी-पुरवठ्याच्या छोट्या योजनांसाठी २५४ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत येणार आहे. त्याशिवाय समाज-विकास योजनांच्या कक्षेतील शेतीसाठी ८५ कोटी रु. देण्यांत येणार आहेत. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत छोट्या पाटबंधाऱ्यांसाठी ७७ कोटी रु. मंजूर करण्यांत आले होते तर दुसऱ्या कार्यक्रमांत ९२ कोटी रु. मंजूर करण्यांत आले होते. पाणीपुरवठ्याच्या खालोखाल जमिनीची धूप व नासधूस थांबविण्याच्या योजनांना प्राधान्य देण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी ११५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कामासाठी २० कोटी रु. ठेवण्यांत आले होते.

## शास्त्रज्ञांना सहकार्य करण्याची हांक

मुंबई येथें भरविण्यांत आलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनांत सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ नीलसबोर ह्यांचें भाषण झालें. त्यांच्या भाषणाचा विषय 'अणु व मानवी ज्ञान' असा होता. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं जगांतील सर्व शास्त्रज्ञांनीं जर आपलें ज्ञान एकत्र केलें आणि आपल्या साधन-सामग्रीनिशीं सहकार्य केलें तर अणूंच्या सूक्ष्म विश्वांत खोल संचार करणें मानवाला शक्य होईल. ह्या सूक्ष्मतम विश्वाच्या तळापर्यंत बुडी मारणें आतां अशक्य राहिलेलें नाहीं. अणु-विज्ञानांत आतांपर्यंत जे प्रयोग करण्यांत आले आहेत. त्यांच्या-मुळें बरीच नवीन माहिती मिळालेली आहे. त्या माहितीवरून असें दिसतें कीं, आणखी मूलगामी संशोधनाला अजून बराच वाव आहे. अणुविज्ञानाची भाषा म्हणजे गणितामधील समीकरणें. त्यांचा अधिक विकास झाला म्हणजे आज जे प्रश्न मानवाची मति कुंठित करून टाकीत आहेत त्यावर बराच प्रकाश पडेल. पण ह्या विषयाला दुसरीहि बाजू आहे. अणुशक्ति हस्तगत झाल्यामुळें मनुष्यापुढें एक मानसिक प्रश्न उत्पन्न झाला आहे. जगांत सर्व ठिकाणीं सर्व लोकांच्या मनांत एक प्रकारची भीति उत्पन्न झाली आहे. एक प्रकारच्या चिंतेनें सर्व लोकांना ग्रासलेले आहे. अणुशक्तीचें प्रचंड सामर्थ्य एखाद्या वेळेस चुकून माणसांच्या नाशासाठी वापरलें जाईल, ही ती चिंता होय. अशा परिस्थितींत जगांतील सर्व शास्त्रज्ञांवर फार मोठी जबाबदारी आलेली आहे. लोकांच्या मनांत ज्या भीतीनें घर केलें आहे. तिचें निवारण करण्याचें मोठें कार्य शास्त्रज्ञांना करावयाचें आहे अणुशक्तीचा उपयोग शांततामय कार्यासाठी व्हावा म्हणून त्यांनीं अहर्निश खटपट केली पाहिजे.

## जपानी मच्छीमारीच्या धंद्याचा अभ्यास

भारतामधील अन्नधान्याच्या तुटवड्यावर उपाय म्हणून मच्छीमारीच्या धंद्याचा विकास करण्याच्या सूचना करण्यांत येत असतात. ह्या धंद्यांत अग्रेसर असणाऱ्या नॉर्वेसारख्या पाश्चात्य देशांकडून भारत सरकार मदतहि घेत असतें. आतां भारत सरकारचें एक प्रतिनिधी मंडळ जपानमधील मच्छीमारीच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठी जाणार आहे. जपान व हिंद ह्यांच्या संयुक्त-मालकीच्या मच्छीमारी कंपन्या स्थापन करतां येतील किंवा काय ह्यासंबंधीहि प्रतिनिधी मंडळ विचार करणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारत सरकार मच्छीमारीच्या धंद्याच्या विकासासाठी ४५ कोटी रुपयांची रक्कम खर्च करण्याची शक्यता आहे. माशांचें उत्पादन करण्याची शक्यता भारतांत पुष्कळ ठिकाणीं आहे. ह्या ठिकाणांचा फायदा घेऊन परदेशीय कंपन्यांच्या सहकार्यानें मच्छीमारीचा धंदा वाढीला लावण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. हिंदमधील लोकांना खाण्यासाठीं अधिक मासे उपलब्ध करून देण्याचाच केवळ हेतु ह्या प्रयत्नांमागें नाहीं. परदेशी हुंडणावळ मिळविण्यासाठी माशांची निर्यात करतां आली तर तीहि करण्याचा उद्देश आहे. मच्छीमारी बोटींचे मोठे तांडे ठेवून मासे पकडण्याच्या कामांत जपानी लोकांना चांगला अनुभव आहे. त्याचप्रमाणें, माशांवर संस्करण करून टिकाऊ अन्नपदार्थ करण्याच्या कामांतहि ते वाकबगार आहेत. जपान-मध्यें मच्छीमारीच्या धंद्याला लागणारीं अवजारेंहि चांगल्या प्रकारचीं तयार होतात. अशा प्रकारचीं अवजारें भारतांत आणून त्यांच्या साह्यानें मच्छीमारीच्या धंद्यांत प्रगति घडवून आणतां येण्यासारखी आहे. भारताचें प्रतिनिधी मंडळ ह्या सर्व प्रश्नांचा अभ्यास करणार आहे.

## कंपनी कायदा : मार्गदर्शनासाठी पांच पुस्तिका

नव्या कंपनी कायद्यांतील निरनिराळ्या कलमांचें व तरतुदींचें स्पष्टीकरण करणाऱ्या पांच पुस्तिकांची एक माला मध्यवर्ती व्यापार व उद्योगखात्याच्या कंपनी कायदा कारभार विभागानें प्रसिद्ध केली आहे. सोप्या भाषेंत लिहिलेल्या या पुस्तिका सामान्य जनतेस तसेंच कंपन्या स्थापन करूं इच्छिणाऱ्यांस उपयुक्त ठरण्यासारख्या असून संदर्भासाठी त्यांचा आधार घेतल्यास कंपनी कायद्याविषयीं स्पष्टीकरणासाठी या विभागाकडे पत्रव्यवहार करण्याची गरज फारशी पडणार नाहीं. या पुस्तिकांत कंपनीची स्थापना, नोंदणी करण्याची पद्धत, कंपनीच्या सभा, दप्तर ठेवण्याची पद्धत, वार्षिक अहवाल व हिशेब सादर करण्याची पद्धत, इ. विषयांचा परामर्श घेण्यांत आला आहे. या पुस्तिकांच्या प्रती दि मॅनेजर ऑफ पब्लिकेशन, नवी दिल्ली यांजकडे अथवा सरकारी प्रकाशनांच्या अधिकृत एजंटांकडे मिळूं शकतील.

## घड्याळ चालविणारा इंजिनिअर

एका म्हाताऱ्या जंगली माणसानें आपलें घड्याळ घड्याळजीकडे दुरुस्तीसाठी आणलें. घड्याळजीनें घड्याळाची मागची बाजू उघडतांच एक मेलेला किडा आंतून बाहेर पडला. घड्याळाचा मालक उद्गारला, "घड्याळ बंद पडलं, त्यांत काय आश्चर्य ? इंजिनिअरच मेल्यावर घड्याळ कसं चालणार ?"

# पूर्वतयारीचें महत्त्व

[अमेरिकन अध्यक्षीय कारकीर्दीत अपूर्व असा दौरा आयसेनहोअरनीं नुकताच पुरा केला. या दौऱ्याची पूर्वतयारी किती बारकाईनें केली होती, याची कल्पना या माहितीवरून येईल.]

### व्यक्तिमत्त्वास औचित्य व पूर्वतयारीची जोड

प्रेसिडेंट आयसेनहोअर यानें युरोप, आशिया आणि आफ्रिका खंडांतील तेरा देशांचा २२,३७० मैलांचा प्रवास तीन डिसेंबर रोजीं सुरू करून संपविला. अमेरिकेच्या कोणत्याहि अध्यक्षानें एवढा मोठा दौरा यापूर्वी केलेला नव्हता. पाश्चात्य राष्ट्रांच्या भूमिकेला त्या सर्वांचा पाठिंबा मिळविणें, हा प्रे. आयसेनहोअर यांचा मुख्य हेतु होता. या तेरा देशांचा अमेरिकेविषयीं दृष्टिकोन कोणता आहे आणि त्यांची अमेरिकेकडून काय अपेक्षा आहे, या दोन प्रश्नांचीं उत्तरें मिळविण्याचें काम या देशांतील अमेरिकन वार्ताहरांनीं आधींच केलें होतें. त्याचा निष्कर्ष असा : (१) रशियाबरोबर शिखर परिषद लवकर भरवावी. अशा परिषदा वरचेवर भरविल्या जाव्या, असें ब्रिटिश पंतप्रधान मॅकमिलनचें म्हणणें. (२) मित्रराष्ट्रांच्या जागतिक मसलतींत आपणांस जास्त वाव मिळावा, असें फ्रेंच प्रेसिडेंट द गोलचें म्हणणें. (३) अमेरिकेचें पश्चिम जर्मनीविषयक, विशेषतः बर्लिनविषयक धोरण खंबीर असावें, अशी पश्चिम जर्मनीचा चॅन्सेलर ॲडेनॉर याची मागणी. (४) अटलांटिक कराराची मजबुती कायम राखण्यांत यावी, बर्लिनच्या बाबतींत मुळींच माघार घेऊं नये, असा इटलीचा आग्रह. (५) ग्रीसची अमेरिकेकडून अधिक मदतीची इच्छा. (६) तुर्कस्तानची रशियाला लागून २४५ मैलांची सरहद्द आणि बल्गेरियाला लागून १२० मैलांची सरहद्द लक्षांत घेऊन आपल्या महत्त्वपूर्ण कामगिरीची व मैत्रीची जाणीव अमेरिकेनें ठेवून अधिक मदत करावी, अशी त्या देशाची मागणी. (७) "अमेरिकेचा आशियांतील सर्वांत सच्चा मित्र" असें स्वतःला म्हणविणाऱ्या पाकिस्तानला रशियाविषयीं वाटणारी भीति आणि वाढत्या आर्थिक मदतीची याचना. (८) बिगर-अरब मुस्लीम देशांच्या भवितव्याबद्दलच्या चिंतेचे आणि अमेरिका-रशिया संबंध सुधारले, तर आपलें कसें होईल, याच्या काळजीचें इराणमधील वातावरण. (९) जनरल फ्रँकोला पाश्चात्य राष्ट्रांनीं वाळींत टाकलें होतें; आयसेनहोअरच्या भेटीमुळें स्पेनशीं इतरांचेंहि जुळेल, अशी स्पेनमधील अपेक्षा. (१०) आयसेनहोअरच्या भेटीमुळें ट्युनिशियाचा प्रेसिडेंट हबीब बोर्गीबाच्या महत्त्वांत वाढ. (११) मोरोक्कोचा तेथील पांच अमेरिकन लष्करी तळांना विरोध आणि अल्जीरियन युद्धाविषयीं त्याचा दृष्टिकोन. (१२) चीनचें आक्रमण पसरल्यास अमेरिकेनें तांतडीनें लष्करी मदत द्यावी, अशी अध्यक्षाची मनोभूमिका तयार करण्याचा भारताचा अप्रत्यक्ष प्रयत्न आणि 'मागण्याचाच अवकाश' असें अध्यक्षाचें आडवळणी भाषेनें, पण सहज लक्षांत येणारें आश्वासन. (१३) अफगाणिस्तानच्या दाऊदची रशिया व अमेरिका यांच्या दरम्यान तारेवरची कसरत आणि आर्थिक मदतीची मागणी.

प्रे. आयसेनहोअरला वेगवेगळ्या देशांतील पुढाऱ्यांशीं कोणत्या प्रश्नांवर बोलणीं करावीं लागलीं असतील, याची कल्पना वरील सारांशावरून येईल. या चर्चेची पूर्वतयारी प्रे. आयसेनहोअरनें अमेरिका सोडण्यापूर्वीच केली होती, हें उघड आहे. ठिकठिकाणीं करावीं लागणारीं लहानमोठीं भाषणें वॉशिंग्टनहून निघण्यापूर्वीच तयार केलेलीं होतीं. केल्व्हिन मॅकन या तज्ज्ञ साहाय्यकाकडे हें काम सोंपविलेलें होतें. आयत्या वेळीं या भाषणांत फरक करावा लागला, तर त्यासाठीं मि. मूस अध्यक्षांच्यासमवेत गेला होता.

### किरकोळ गोष्टींहि अचूक होण्याची दक्षता

प्रे. आयसेनहोअर कुठेंहि असला, तरी त्याला अध्यक्षाचें काम कार्यक्षमतेनें बजावतां यावें, यासाठीं वॉशिंग्टनशीं दळणवळण कायम राखण्याची व्यवस्था दक्षतेनें करण्यांत आली होती. परदेशीयांचीं शेंकडों विचित्र नांवें त्याला वेळेवर आठवून तीं अचूक उच्चारतां यावींत, यासाठीं त्यांची रंगीत तालीम करण्यांत आली होती. प्रत्येक देशांतील चालू घडामोडींची त्याला माहिती करून देण्याचा उद्देश त्यांच्या संभाषणांत त्यांचा योग्य उल्लेख व्हावा, हा होता. स्थानिक रीतिरिवाजांचें उल्लंघन होऊं नये, यासाठींहि त्याला पढविण्यांत आलें होतें.

तेराहि देशांसाठीं स्वतंत्र अशा वह्या करण्यांत आल्या होत्या. ज्या ज्या ठिकाणीं प्रे. आयसेनहोअर थांबणार, त्या त्या ठिकाणची आवश्यक ती माहिती त्या त्या वहींत लिहिलेली होती. स्थानिक भूगोल, इतिहास, हवामान, विभागीय आर्थिक व राजकीय परिस्थिति, यजमान देश व अमेरिका यांच्यांत चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांचा सारांश, हीं सर्व त्या वह्यांतून प्रे. आयसेनहोअर यानें वाचली. ज्या पुढाऱ्यांची गांठ पडणार त्यांचीं नांवें व त्यांचें कार्य, याचाहि त्यांत आढावा होता. प्रेसिडेंटच्या हातून चूक होऊं नये, प्रत्येक गांवाचें नांवहि योग्य प्रकारें उच्चारलें जावें, यासाठीं सर्व दक्षता घेतली होती.

रोजच्या कार्यक्रमांत प्रेसिडेंट आयसेनहोअरला पुरेशी विश्रांति मिळावी, अशी योजना केलेली होती. त्याच्याबरोबर त्याचे डॉक्टर, मेजर जनरल हॉवर्ड मॅक स्नायडर होतेच. स्वतःच्या बरोबर अमेरिकेंतून बाटल्या भरून आणलेलें पाणीच तो पीत असे. 'त्याचा तो शिरस्ताच आहे; कृपया राग मानूं नका,' असें यजमानांना आगाऊ कळविलें होतें. ठिकठिकाणच्या अमेरिकन वकिलांनीं जेवणाच्या बाबतींत दक्षता घेऊन अध्यक्षाचें पोट न बिघडण्याची जबाबदारी उचलली होती.

### अगोदर प्रवास करून दौऱ्याची पाहणी:

प्रे. आयसेनहोअरच्या प्रवासापूर्वी त्याच्या कचेरींतील अधिकाऱ्यांनीं प्रेसिडेंट ज्या मार्गानें जाणार त्याच मार्गानें जेट विमानांतून प्रवास केला होता आणि प्रत्येक ठिकाणच्या व्यवस्थेची काळजीपूर्वक पाहणी केली होती. प्रेसिडेंटच्या संरक्षणाच्या तयारीची खात्री करून घेतली व त्याच्या मनासारखी प्रत्येक गोष्ट उतरेल असा प्रयत्न केला. या अधिकाऱ्यांत प्रेसिडेंटचे दोन विश्वासू सल्लागार हॅगर्टी व स्टीफन्स होते. प्रेसिडेंटचा खास वैमानिक कर्नल विल्यम ड्रेपर यानेंच हें विमान चालवून प्रत्येक विमानतळाचा प्रचंड जेट विमान उतरविण्याच्या दृष्टीनें आवाका घेतला होता. प्रेसिडेंटबरोबरची मंडळी व पत्रकार यांच्या उतरण्याची सोय आगाऊ करण्यांत आली होती. प्रत्येक ठिकाणीं त्यांच्या वाहतुकीचीहि व्यवस्था आधींच करून ठेवलेली होती. प्रत्येक देशांतील अपेक्षित हवामान, अन्न, आरोग्य इत्यादिविषयक टिपणें व्हाइट हाऊसकडे (अमेरिकन अध्यक्षाचें निवासस्थान) पाठवून त्याचा सल्ला तयार राखण्यांत आला होता. प्रेसिडेंटबरोबर ८४ वार्ताहरांना व छायाचित्रकारांना घेण्यांत आलें होतें. हे सर्व स्वतंत्र जेटनें प्रेसिडेंटच्या आधीं एक तास प्रत्येक ठिकाणीं जाऊन दाखल होत असत. प्रेसिडेंटच्या विमानांत एका वार्ताहराला व

छायाचित्रकाराला सर्वांच्या वतीनें आलटूनपालटून जागा मिळत असे. वॉशिंग्टनशीं सतत संबंध राखण्याचें काम जनरल गुडपॅस्टरमार्फत प्रेसिडेंट करी. हॅगर्टीकडे वार्ताहरांना सांभाळण्याची कामगिरी होती आणि स्टीफन्सकडे खास असें काय नव्हतें! सगळीकडे लक्ष ठेवून अनपेक्षित अडचणी दूर करण्यासाठी त्याची योजना होती.

प्रेसिडेंटच्या दौऱ्याचें स्वरूप खाजगी होतें. त्याच्याबरोबर राजकीय महत्त्वाचा असा एकच अधिकारी होता, तो म्हणजे परराष्ट्रखात्याचा उपचिटणीस रॉबर्ट मर्फी. दौरा संपतांच मर्फीहि सेवानिवृत्त व्हावयाचा होता. परराष्ट्रमंत्री हर्टर यानें टुलोन येथें अठरा डिसेंबर रोजीं पॅरिसला जाण्यासाठी प्रेसिडेंट आगगाडींत बसला तेव्हां त्याच्या डब्यांत प्रवेश केला!

प्रेसिडेंटबरोबर त्याची पत्नी नव्हती, पण त्याचा मुलगा मेजर जॉन आयसेनहोअर आणि सून बार्बरा ही होती. त्यांनाहि कमी–अधिक प्रमाणांत प्रवासाची पूर्वतयारी करावी लागली. प्रेसिडेंट आयसेनहोअर जेथे जेथें गेला, तेथें तेथें त्यानें समयोचित आकर्षक वागणुकीनें, संभाषणानें व सार्वजनिक वक्तव्यांनीं लोकांचीं मनें जिंकलीं तीं उगाच नाहीं. पूर्वतयारीलाहि त्याचें बरेंच श्रेय द्यावें लागेल. आकस्मिक समजल्या जाणाऱ्या गांठीभेटीसुद्धां नियोजितच असतात, इतकी पूर्वतयारी केली जाते!

(श्री. वा. काळे, ह्यांचा "स्वराज्य" मधील लेख)

---

## पंचवार्षिक कार्यक्रमांना लोकसंख्येचा धोका

ब्रिटिश सरकारच्या आरोग्यखात्याचे सल्लागार मि. ब्लॅकर ह्यांनीं जगांतील लोकसंख्येच्या वाढीकडे लक्ष वेधलें आहे. ब्रिटनमधील सार्वजनिक आरोग्यखात्याच्या माहला अधिकारी वर्गाच्या सभेंत ते बोलत होते. ते म्हणाले कीं सध्या जगाची लोकसंख्या वेगानें वाढत आहे. तो वेग तसाच राहिल्यास ४० वर्षांत लोकसंख्येंत दुप्पटीनें वाढ होईल. ब्रिटनपुरतें बोलावयाचें झाल्यास ब्रिटनमधील लोकसंख्या आस्तेकदम वाढत आहे. पण ब्रिटनमध्यें पुन्हा एकदां मंदीची लाट आली तर ब्रिटनमधील दर, हजारीं जन्माचें प्रमाण सध्यापेक्षा आणखी खालीं जाईल. कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं, पाश्चात्य देशांनीं भारतावर संततिनियमनाची एक प्रकारची सक्ती करून त्या देशाशीं नैतिक दृष्ट्या असमर्थनीय ठरेल अशी वागणूक केली आहे. पण, ह्या समजुतींत मुळींच तथ्य नाहीं. भारतानें स्वातंत्र्य मिळाल्यावर आपला पहिला पंचवार्षिक-कार्यक्रम आखला. ह्या कार्यक्रमाचा बोजवारा उडाला. कारण, भारताच्या वाढत्या लोकसंख्येमुळें कार्यक्रमाचा फारच थोडा उपयोग झाला. आतां संततिनियमनाचा प्रचार व अंमलबजावणी ह्यांना खूप महत्त्व देण्यांत येत आहे. तरीसुद्धां भारताला आपली लोकसंख्या कमी करण्याच्या बाबतींत फारसें यश आलेलें नाहीं. आतां ज्या स्त्रियांना तीन किंवा चार मुलें झालेलीं असतील त्यांनीं स्वेच्छेनें शस्त्रक्रिया करून घ्यावी असें सुचविण्यांत येत आहे. गेल्या दहा वर्षांत जपाननें मात्र लोकसंख्या घटविण्याच्या कामांत नेत्रदीपक यश मिळविलें आहे. जपानचें दरहजारीं जननाचें प्रमाण दहा वर्षांपूर्वी ३४ होतें; आतां तें १० पर्यंत खालीं आलें आहे. पण हें यश ज्या मार्गानें मिळविण्यांत आलें आहे तो मार्ग बहुतेक लोकांना नापसंत असा आहे. भ्रूणहत्या कायदेशीर करून जपाननें लोकसंख्येच्या वाढीची गति कमी केली आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें मांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल मांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा
(४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक)
(६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें मांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल मांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## चित्रमयजगत् सुवर्णमहोत्सव विशेषांक

"चित्रमय जगत्" मासिकानें आपलें ५१ व्या वर्षातील पदार्पण जानेवारी, १९६० चा अंक "सुवर्णमहोत्सव विशेषांक" म्हणून प्रसिद्ध करून साजरें केलें आहे. "चित्रमय-जगत्"चा इतिहास श्री. त्र्यं. र. देवगिरीकर ह्यांनीं लिहिला आहे. "चित्रमय जगत्'च्या स्थापनेचा उद्देश राजकीय क्रांतिकारकांची विचारप्रणाली जनतेपुढें मांडण्याचा नव्हता, हे श्री. देवगिरीकरांनीं स्पष्ट केलें आहे. इंग्लंडमधील "इलस्ट्रेटेड लंडन न्यूज"च्या धर्तीवर संपूर्ण चित्रमय मासिक काढण्याचा संकल्प, म्हणजेच "चित्रमयजगत्." मराठींत त्यावेळीं अशा प्रकारचें एकहि मासिक नव्हतें. अर्थात्, केवळ चित्रें हेंच ह्या मासिकाचें उद्दिष्ट किंवा आकर्षण नव्हतें. "स्वराज्याची इच्छा बाळगणाऱ्या लोकांनीं जनतेची दृष्टि व्यापक होईल, त्यामध्यें ऐक्य बाणेल व ते विद्येनें तेजस्वी होतील, असें करण्याचा प्रयत्न करावा. व्यापक विचार, ऐक्य व ज्ञान हे तीन मार्ग ज्या ठिकाणीं जाऊन एकत्र मिळतात, तेथें 'स्वराज्य' असतें असा वेदाचा उपदेश आहे." "चित्रमयजगत्"च्या पहिल्या अंकाच्या पहिल्या पानाचा मुख्य मजकूर म्हणून दिलेल्या सूक्ताचा हा अनुवाद आहे. त्यावरून "चित्रमयजगत्"चें ध्येय स्पष्ट होईल. ह्या मासिकाला प्रथमपासूनच विद्वान्, लोकप्रिय व व्यासंगी लेखक लाभले व त्यांनीं आपले विचार ह्या मासिकांतून प्रकट करून वाचकांची अभिरुचि तृप्त केली, इतकेंच नव्हे तर तिला इष्ट असें वळणहि लावलें. वासुकाकांच्या व्यापक दृष्टिकोनामुळें "चित्रमयजगत्"च्या द्वारां विज्ञान, वैद्यक, यंत्रशास्त्र, शेतकी, भौतिकशास्त्रें, इत्यादिविषयक शास्त्रीय शोधांची माहिती वाचकांना मिळत असे. इंग्लंड-अमेरिकेंतील मासिकेंच नव्हे, तर दैनिकेंहि वासुकाका मागवीत असत आणि त्यांचा उपयोग "चित्रमयजगत्"साठी करीत असत. "चित्रमयजगत्"-चे पहिले जाहीर संपादक श्री. त्र्यं. र. देवगिरीकर (१९२७ ते १९४८) असून ते आतां त्या मासिकाचे संचालक आहेत आणि श्री. रा. प्र. कानिटकर ह्यांनीं श्री. देवगिरीकरांची जागा भूषविली आहे. "चित्रमयजगत्"चें वैशिष्ट्य त्यांनीं कायम राखलें आहे आणि खास अंकांच्याद्वारां लोकशिक्षणाचें बहुमोल कार्य चालविलें आहे. प्रस्तुत विशेषांकांत गेल्या ५० वर्षांचा आढावा घेणारे, नामवंत आणि अनुभवी लेखकांचे लेख देण्यांत आले आहेत. "चित्रमयजगत्"ला आम्हीं राष्ट्रसंवर्धनाच्या कामीं अधिकाधिक यश चिंतितों.

---

### परदेश-प्रवासासाठीं मंजूर केलेलें परकीय चलन

परदेशांत जाण्यासाठी व्यापारी, विद्यार्थी व इतर यांना १९५७, १९५८ व गेल्या वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांत मंजूर करण्यांत आलेल्या परकीय चलनाची आंकडेवारी खालीलप्रमाणें आहे:—

(आंकडे लक्ष रुपयांचे)

| | १९५७ | १९५८ | जाने.–सप्टेंबर १९५९ |
|---|---|---|---|
| व्यापारी | ८७ | ९१ | ९६·५५ |
| विद्यार्थी | ३१० | ३४९ | ३११·८४ |
| इतर (सरकारी कामकाजासाठी आणि शिक्षणासाठी गेलेले सोडून) | २६५ | २७४ | २९८·८२ |

हौशी भारतीय प्रवाशांना प्रवास करण्यास उत्तेजन देण्यासाठी परकीय चलनविषयक निर्बंध सैल करण्यांत आलेले नाहींत.

## भिलई येथील २,००० रशियनांचें जीवन

भिलई येथील पोलादाच्या कारखान्यांत रोल्ड स्टीलचें उत्पादन सुरू झालें, त्यानिमित्त पंतप्रधान नेहरू आणि पंतप्रधान क्रुश्चेव्ह ह्यांनीं एकमेकाला संदेश पाठवून भारत-रशिया सहकाराचे गोडवे गाइले. भारतीय व रशियन लोकांच्या सहकार्याचें भिलई येथील कारखाना हें उत्कृष्ट प्रतीक असल्याचें दोघांनीं म्हटलें आहे. वास्तविक, ह्या कारखान्याच्या उभारणीचें काम मूळ अंदाजापेक्षा एका वर्षानें मागें पडलें तरीसुद्धां त्याबद्दल कोणाचीच तक्रार नाहीं. उशीर होण्याचें कारण भारतीयांची दिरंगाई आहे. विजगापट्टम् बंदरांत वाया जाणारा वेळ रशियन तंत्रज्ञांना अंदाजता आला नाहीं आणि शिकून तयार करण्यासाठी पुरेसे लायक हिंदी उमेदवार लवकर मिळाले नाहींत. तथापि, भिलई येथील रशियन-हिंदी संबंध अत्यंत सलोख्याचे आहेत. त्यांचीं कारणें अशीं:— रशियन तज्ज्ञांना पेटंटची भीति वाटत नाहीं; आपलें सर्व ज्ञान तें हिंदी लोकांना देण्यास तयार असतात. स्थानिक परिस्थितींशीं समरस होण्याचा रशियनांचा प्रयत्न आहे. मध्यभारत सरकारनें देऊं केलेले दारूचे परवाने घेण्यास रशियन लोकांनीं–सुमारें दोन हजार रशियन तेथें आहेत–नकार दिला आहे. भाषा आणि खाद्य ह्यांतील फरकामुळें रशियन व भारतीय ह्यांचा एकमेकांशीं फारसा संबंधच येत नाहीं. दक्षिण भारतांतून आलेले हिंदी लोक जुन्या वळणाचे, शाकाहारी आणि अल्प-संतुष्ट असतात. हिंदी काय आणि रशियन काय, कुणालाच क्लबांत जाण्याची आवड नाहीं. इस्पितळांत भेदाभेद केला जात नाहीं; रशियनांची शाळा मात्र वेगळी आहे. त्यांत ६ ते १० वर्षांच्या १७२ मुलांमुलींना रशियन माध्यमांतून शिक्षण दिलें जातें.

रशियन लोकांना हिंदी लोकांचेविषयीं जें काय वाटतें, तें रशियनमधूनच बोललें जात असल्यामुळें हिंदी लोकांना तें समजत नाहीं! हिंदी लोकांना रशियनांचा मत्सर वाटत नाहीं. कारण, रशियन जरी यांत्रिक बाबतींत पुढें गेले असले, तरी सांस्कृतिक दृष्ट्या आम्हींच पुढें आहोंत असें आपण मानतों. रशियनांची रहाणी कामगार स्वरूपाची असल्यानें, मद्रासी ब्राह्मणाला त्याचा हेवा कशाला वाटेल? रशियन स्त्रियांच्या ओंमळ्या आणि हूल, दागिन्यांचा सुकाळ माहीत असलेल्या हिंदी स्त्रियांना आकर्षून घेत नाहींत. रशियन मनुष्य हा स्वतंत्र नाहीं, अशी हिंदी लोकांची कल्पना. त्यामुळें रशियन लोकांचेबद्दल तिडीक उत्पन्न होऊं शकत नाहीं. म्हणूनच, भिलई येथील रशियन–भारतीयांचें सहजीवन शक्य झालें आहे.

---

### मुंबई राज्यांत कागदाच्या तीन गिरण्या

कागदाच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें ११ नव्या छोट्या कागद गिरण्या स्थापण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. यासाठी आवश्यक ते परवानेहि देण्यांत आले आहेत. या ११ योजना पार पाडण्यासाठी सुमारें २२ लक्ष रुपयांची परकीय हुंडणावळ लागेल.

या संकल्पित गिरण्यांची एकूण वार्षिक उत्पादनशक्ति २१,२०० टन कागद असेल. यांपैकी तीन गिरण्या मुंबई राज्यांत स्थापन होणार असून त्यांची एकूण वार्षिक उत्पादन-शक्ति ७,२०० टन असेल.

सन १९५९ मधील कागदाचें उत्पादन सुमारें ३ लाख टन होतें. १९४८ चा तत्सम आंकडा एक लाख टनांहूनहि कमीच होता. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर कागदाचें उत्पादन ४·२ लाख टनांपर्यंत जाण्याची अपेक्षा आहे.

## चित्तरंजन कारखान्याची प्रगति

भारत स्वतंत्र झाल्यावर लवकरच जीं औद्योगिक कामें सरकारनें हातीं घेतलीं त्यांत चित्तरंजन कारखान्याचा समावेश होतो. खंडप्राय असलेल्या भारतासारख्या देशाला रेल्वेवाहतुकीचें महत्त्व किती आहे तें सांगण्याची गरज नाहीं. तथापि रेल्वे-वाहतुकीसाठीं लागणारीं एंजिनें परदेशांतून मागवावीं लागत असत. ही उणीव भरून काढण्यासाठी चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनांचा कारखाना १० वर्षांपूर्वी काढण्यांत आला. आतां त्या कारखान्यांत प्रत्येक ४८ तासांत एक संपूर्ण रेल्वे एंजिन तयार होऊं लागलें आहे. इतकेंच नव्हे, तर आगामी कांहीं वर्षांनीं ह्या कारखान्यांतील एंजिनें परदेशीं निर्यात होण्याची शक्यताहि दिसूं लागली आहे. सरकारी मालकीच्या ह्या कारखान्यानें गेल्या १० वर्षांत वाफेच्या शक्तीनें चालणारीं सुमारें ९५० एंजिनें निर्माण केलीं आहेत. पण ह्याहीपेक्षा उल्लेखनीय गोष्ट म्हणजे विजेवर चालणाऱ्या एंजिनांची निर्मिति. अशा प्रकारचें पहिलें एंजिन चालू सालाच्या नोव्हेंबर महिन्यांत तयार होईल असा अंदाज आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कारखान्यापुढें जें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें तें त्यानें गांठलें आहे. आतां भारत एंजिनांच्या बाबतींत स्वयंपूर्ण झालेला आहे. एक रेल्वे एंजिन तयार करण्यासाठीं ५,३३० भाग तयार करून जोडावे लागतात. ह्यांपैकी कांहीं भाग भारतांत तयार होत नसत. पण, आतां अशा भागांची संख्या १४ पर्यंत खालीं आली आहे. दुर्गापूर, भिलई आणि रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांतून जरूर त्या प्रतीचें पोलाद मिळूं लागल्यावर १०० टक्के स्वदेशी रेल्वे एंजिनें बनवितां येतील असा विश्वास चित्तरंजन कारखान्याच्या चालकांना वाटत आहे. चित्तरंजन कारखान्यानें केलेली ही प्रगति स्पृहणीय वाटते.

## ऑस्ट्रेलियन लेखकाला इंग्रजी साहित्याबद्दल बक्षीस

१ जानेवारी, १९५७ ते ३१ डिसेंबर, १९५८ ह्या मुदतींत, इंग्रजी वाङ्मयांत सर्वोत्कृष्ट भर घालणाऱ्या पुस्तकासाठी डब्ल्यु. एच. स्मिथ अँड सनचें वार्षिक १,००० पौंडांचें बक्षीस देण्याचा समारंभ लंडन येथील सेव्हॉय हॉटेलांत नुकताच पार पडला. पॅट्रिक व्हाईट ह्या ऑस्ट्रेलियन लेखकाला त्याच्या व्हास (Voss) ह्या कादंबरीबद्दल हें बक्षीस मिळालें. कंपनीचे चेअरमन ऑनरेबल डेव्हिड स्मिथ, ह्यांनीं बक्षिसाच्या पुस्तकाचें व त्याच्या लेखकाचें नांव जाहीर करतांच पडदा उघडला गेला आणि स्टेजवरील आठ फूट उंचीचें पुस्तक (मूळ पुस्तकाची मोठी केलेली आकृति) आणि लेखकाचा फोटो उपस्थितांच्या दृष्टीस पडलों आणि तो पाहतांच त्यांनीं टाळ्या वाजविल्या.

## हिंदी आर्थिक परिषदेचें ४३ वें अधिवेशन

इंडियन इकॉनॉमिक असोसिएशनची वार्षिक सभा अन्नमलाईनगर येथें भरली होती. त्यावेळीं, हिंदी आर्थिक परिषदेचें येतें अधिवेशन चंदिगड येथें भरविण्याचें ठरलें. प्रो. ए. के. दासगुप्ता हे अध्यक्षस्थानीं असतील.

## "तो तुमचा प्रश्न आहे"

"नव्या पातळीची खरेदी, वाटतं!" पति ओरडला. "त्याचं बिल द्यायला पैसे कुठून आणायचे?"

"तो तुमचा प्रश्न आहे" पत्नीनें उत्तर दिलें. "पैशाच्या बाबतींत सल्ला देण्याची माझी पात्रता नाहीं."

## मेट्रिक वजनांचें उत्पादन

आतांपर्यंत आंध्र प्रदेश, मुंबई, केरळ, मद्रास, म्हैसूर आणि पंजाब व मध्यवर्ती केन्द्रशासित दिल्ली राज्यांतील १०६ कारखान्यांना व्यापारी वजनें तयार करण्यासाठी परवाने देण्यांत आले आहेत. देशांतील वजनामापांची अधिक मागणी पूर्ण करण्यासाठी सरकारी मालकीचे मेट्रिक वजनामापांचें उत्पादन करूं शकणारे कांहीं कारखाने धरून सध्यां देशांत असे ३०५ कारखाने आहेत.

सध्यां ५·४ कोटी वजनें आणि १० लक्ष मापें सर्वत्र वापरांत आहेत, असें नॅशनल सॅम्पल सर्व्हे या संस्थेनें केलेल्या अंदाजावरून समजतें. येत्या दोनएक वर्षांत या सर्वांच्याऐवजीं नवीन वजनेमापें प्रचारांत येतील. नवीन वजनामापांची विक्री परवानेदार विक्रेत्यांकडून होईल.

**भुवनेश्वर येथें खुलें नाट्यगृह**—रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या १०० व्या जन्मदिनाच्या निमित्तानें ओरिसाची राजधानी भुवनेश्वर येथें एक खुलें नाट्यगृह बांधण्यांत येणार आहे. नाट्यगृहांत सर्व आधुनिक सोयी करण्यांत येणार आहेत. नाट्यगृहासाठी ७ लाख रु. खर्च येईल. त्यांपैकीं निम्मी रक्कम मध्यवर्ती सरकार देणार आहे.

**पश्चिम बंगाल सरकारला कर्ज**—पश्चिम बंगालमधील रेल्वे मार्गांचें विद्युतीकरण करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारला ४८ लाख रुपये कर्ज म्हणून मंजूर केले आहेत. ह्या कामासाठी पश्चिम बंगाल सरकारला ३२० लाख रुपयांची गरज आहे. कर्जाचा हा पहिला हप्ता आहे. पूर्व व आग्नेय रेल्वेवरील कांहीं मार्गांचें विद्युतीकरण करण्यांत येणार आहे.

**होसपेटला साखरेचा कारखाना**—होसपेट येथील उसाच्या शेतकऱ्यांनीं व व्यापाऱ्यांनीं साखरेचा कारखाना काढण्याचा विचार चालविला आहे. होसपेटपासून ७ मैलांवर कमलापूर येथें हा कारखाना उभारण्यांत येण्याचा संभव आहे. कारखाना सहकारी तत्वावर चालविण्यांत यावयाचा असून त्यासाठी रोज १,००० टन ऊंस गाळण्याची शक्ति असलेली यंत्रसामुग्री मागविण्यांत येईल.

**लोणी व तुपाचा कारखाना**—बिहारमध्यें काढण्यांत यावयाच्या लोणी व तूप तयार करण्याच्या कारखान्याचा पायाचा दगड नुकताच बसविण्यांत आला. ग्रामीण विभागांतील ह्या कारखान्यासाठी ७·६ लाख रुपये खर्च येणार आहे. कारखान्यांत दरसाल सुमारें ४॥ लाख पौंड खारवलेलें लोणी व सुमारें ३॥ लाख पौंड तूप तयार करण्यांत येईल.

**क्षयरोगी प्रवाशांसाठी सोय**—पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं सोनगड ह्या ठिकाणीं, क्षयरोगानें पछाडलेल्या प्रवाशांसाठी एक वेगळी विश्रांतीची खोली बांधण्याचें ठरविलें आहे. राजस्थानमधील एका स्टेशनावरहि अशाच प्रकारची खोली बांधण्यांत येणार आहे.

**शाकाहारानें प्रश्न सुटेल**—आंतरराष्ट्रीय शाकाहारी संघाचे अध्यक्ष मि. हॉडसन ह्यांच्या मतानें जगानें शाकाहाराचा स्वीकार केला तर वाढत्या लोकसंख्येला लागणाऱ्या अन्नाचा प्रश्न सुटेल. कारण, मांसासाठी प्राण्यांना ज्या वनस्पती पुरविण्यांत येतात त्यांपैकीं फारच थोड्या भागाचें प्राण्यांच्या मांसांत रूपांतर होतें. बराचसा भाग वाया जातो. माणसांनीं शाकाहारच केला तर हा वाया जाणारा भाग कामी येईल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.